महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दुरध्वनी क्रमांक : ०२२- २२८८१८९७** **email: desk१९-gad@mah.gov.in**

---

**क्रमांक:संकीर्ण २०२४/ प्र.क्र. ४१०/आस्था-१** **दिनांक: ०५ डिसेंबर, २०२४**

**प्रति,**

संचालक,
माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
मंत्रालय, मुंबई.

**विषय:-** सेवानिवृत्त २ कक्ष अधिकारी, ६ सहायक कक्ष अधिकारी, २ लघुलेखक यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता जाहिरात देण्याबाबत.

**संदर्भ:-** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक, संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६.

महोदय,

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सेवा, तंत्रज्ञान व आस्थापनाविषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या गट - ब (राजपत्रित) संवर्गातील कक्ष अधिकारी व गट -ब (अराजपत्रित) संवर्गातील सहायक कक्ष अधिकारी व लघुलेखक या पदांवरुन सेवानिवृत्त झालेल्या २ कक्ष अधिकारी, ६ सहायक कक्ष अधिकारी व २ लघुलेखक यांची १ वर्षाकरीता सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची असून त्याकरीता प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीचा मसुदा सोबत जोडला आहे.

तरी सदर जाहिरात दिनांक १० डिसेंबर, २०२४ रोजी सामान्य प्रशासन विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपली,

**सोबत : वरीलप्रमाणे**

**( प्रियांका तावडे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत- सहपत्रासह आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित,

**कक्ष अधिकारी (तांत्रिक), माहिती तंत्रज्ञान संचालनालय, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई.**

यांना विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेला जाहिरातीचा मसुदा तसेच जाहिरातीबाबतचा अधिक तपशिल सामान्य प्रशासन विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.

Advertisement for Website

## सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

### सेवानिवृत्त कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी व लघुलेखक यांची आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता नामिकासूची (Panel) तयार करण्याबाबत.

सामान्य प्रशासन विभागातील कामकाजाचा तसेच सेवा, आस्थापना, तंत्रज्ञानविषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या गट - ब (राजपत्रित) संवर्गातील कक्ष अधिकारी व गट - ब (अराजपत्रित) संवर्गातील सहायक कक्ष अधिकारी व लघुलेखक या पदांवरुन सेवानिवृत्त झालेल्या २ कक्ष अधिकारी, ६ सहायक कक्ष अधिकारी व २ लघुलेखक यांची आवश्यकतेनुसार सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता नामिकासूची (Panel) तयार करावयाची आहे.

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर,२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

अधिक माहिती सामान्य प्रशासन विभागाचे संकेतस्थळ https://gad.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईटवरील माहितीचे अवलोकन करून अर्ज सादर करावेत.

जाहिरातीच्या दिनांकापासून १० दिवसांत अर्ज सादर करावा.

(कि. का. शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
०२२-२२८८१८९७

Details on Website

## सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

## सेवानिवृत्त कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी व लघुलेखक यांची आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता नामिकासूची (Panel) तयार करण्याबाबत.

**विभागाची आवश्यकता :**

सामान्य प्रशासन विभागातील कामकाजाचा तसेच सेवा, आस्थापनाविषयक, तंत्रज्ञानासंबंधित (उदा. e-HRMS, E-office) कामकाजाचा अनुभव असलेल्या (राजपत्रित) संवर्गातील कक्ष अधिकारी तसेच अराजपत्रित संवर्गातील सहायक कक्ष अधिकारी व लघुलेखक या पदांवरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांची खाली नमूद केलेल्या कामांसाठी आवश्यकतेनुसार करार पद्धतीने नियुक्ती करण्यासाठी नामिकासूची (Panel) तयार करण्याचे प्रस्तावित आहे:-

| अ.क्र. | पद | कार्यासन/ आवश्यक पदे | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | कक्ष अधिकारी | २ | e-HRMS प्रणालीचे नुतनीकरण, वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती, स्वग्राम, रजा सवलत, एल.टी.सी. घरबांधणी व इतर अग्रीम, यांसारखे नवीन मोड्युल तयार करणे, त्यांचे प्रमाणिकीकरण करणे. |
| २ | सहायक कक्ष अधिकारी | ६ | e-HRMS प्रणालीचे नुतनीकरण, नवीन मोड्युलच्या अंतर्गत आवश्यक त्या माहितीचे संकलन, माहिती अद्ययावत करण्याची कार्यवाही. |
| ३ | लघुलेखक | २ | e-HRMS प्रणालीचे नुतनीकरण करण्याकरीता तसेच नव्याने समावेश करण्यात येणा-या प्रणालींचे समन्वयन, बैठका, त्यांचे इतिवृत्त व इतर तदनुषंगिक बाबी. |

**अटी व शर्ती -:**

१. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५ / प्र.क्र.१००/ १३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.
२. उमेदवार मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी व लघुलेखक या पदावरुन सेवानिवृत्त झालेला अधिकारी / कर्मचारी असावा.
३. उमेदवारास कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी व लघुलेखक या पदावरील किमान ३ ते ५ वर्षांचा अनुभव असावा.
४. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.
५. उमेदवारास तंत्रज्ञानाचे चांगले ज्ञान असावे.
६. उमेदवाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.
७. उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

८. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

९. उमेदवाराने सदर पदाकरिता वेबसाईटवरील माहितीचे अवलोकन करुन **desk१९-gad@mah.gov.in** या मेल आयडीवर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून त्यांचे अर्ज **१० दिवसांच्या आत सादर करावेत.** या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२८८१८९७ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

१०. विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

११. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

१२. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांस सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

१३. निवड करण्यात आलेल्या अधिका-यांची नामिकासूची तयार करून विवक्षित कामाची निकड विचारात घेऊन त्यांचेमधून आवश्यक कर्मचाऱ्यांची सेवा घेण्यात येईल.

१४. इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

———— x ———— x ————

अर्जाचा नमुना

सेवानिवृत्त कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी व लघुलेखक यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

उमेदवाराने अलीकडील काळातील स्वतचे : छायाचित्र येथे चिकटवावे

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-.................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-.................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-.................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :-.................................................

५) जन्म दिनांक व वय :-.................................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

७) अनुभव :-.................................................

८) सामान्य प्रशासन विभागाच्या संकेतस्थळावर दि.-----------रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने -------- या पदासाठी मी काम करण्यास इच्छुक असून जाहिरातीतील / सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

९) आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली आहेत.

ठिकाण -:

दिनांक -:

अर्जदाराची स्वाक्षरी